**CNRNo.MHSI**010005162020

<u>नियमित दिवाणी पुनर्वाद क्र. ५५/२०२० मधील नि. ३१ खालील आदेश</u>.

**(गंगाबाई डिचोलकर (मयत) तर्फे वारस भास्कर डिचोलकर – पुनर्वादी वि. किरण डिचोलकर (मयत) तर्फे वारस कविता डिचोलकर वगैरे – उत्तरवादी)**

...............

१. प्रस्तुतचा अर्ज पुनर्वादी यांनी पुनर्वादपत्रामध्ये उत्तरवादी क्र. १(क) चे नांवात "Bharti Ajit Pednekar" ऐवजी "Aditi Ajit Pednekar" अशी दुरुस्ती करणेची परवानगी मिळणेकामी दाखल केला आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज व त्यावरील उत्तरवादींच्या म्हणण्याचे अवलोकन केले.

३. प्रस्तुतकामी मागितलेली दुरुस्ती ही अनवधानाने व नजरचुकीने झालेल्या टंकलेखनाची तांत्रीक स्वरुपाची दुरुस्ती असल्यामुळे, तसेच सदरहू दुरुस्ती करणेस परवानगी दिल्यास उत्तरवादींचे कोणतेही नुकसान होणार नसल्यामुळे, सदरचा अर्ज न्यायाचे दृष्टीने मंजूर करणे योग्य आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. पुनर्वादीने पुनर्वादपत्रात "Bharti Ajit Pednekar" ऐवजी "Aditi Ajit Pednekar" अशी दुरुस्ती विहीत कालावधीमध्ये करावी व पुनर्वादपत्राची सुधारीत प्रत अभिलेखावर दाखल करावी.

सही/–

दिनांकः– ११/०१/२०२३

(सं.जु.भारुका)

प्रमुख जिल्हा न्यायाधीश,

सिंधुदुर्ग–ओरोस.